जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ९७ दिनांक - ०८/०२/२०२५**

युनिट-०४ गुन्हे शाखा,पुणे शहर

## खुनाच्या गुन्हयातील आरोपीच्या ०४ तासा मध्ये गुन्हे शाखा, युनिट ०४ ने आवळल्या मुसक्या

यातील मयत इसम नामे महेश तुपे वय ५६ वर्षे रा.पाषाण पुणे हे दिनांक ०८/०२/२०२५ रोजी सकाळी ०६/०० वा. ते ०६/३० वा.सुमा.दुध आणण्याकरीता गेले असता त्यांना कोकाटे आळी गणपती मंदीरा जवळ पाषाणगाव पुणे येथे कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी धारदार हत्याराने गंभीर जखमी करुन खुन केला आहे.अशी खबर प्राप्त झाल्याने तात्काळ वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.अजय वाघमारे,गुन्हे शाखा युनिट-४ पुणे शहर व युनिट-४ चे पथक असे घटनास्थळाची पाहाणी करुन माहिती घेतली असता मयत इसम नामे महेश तुपे यांचा जागेच्या वादावरु आरोपी नामे ओम निम्हण व दोन इसम सर्व रा.पाषाण पुणे यांनी संगणमताने धारदार शस्त्राने हल्ला करुन जिवे ठार मारुन पळुन गेल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाले.

सदर आरोंपीतांचा वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.अजय वाघमारे, व युनिट ४ चे पथक शोध घेत असताना **पोलीस हवालदार अजय गायकवाड व हरिष मोरे** यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, मयत महेश तुपे याचे खुना मध्ये सहभागी असलेला इसम नामे ओम बाळासाहेब निम्हण हा विठ्ठल मंदिराचे पाठीमागे पेरुचे बागेच्यागेट जवळ पाषाण पुणे येथे थांबलेला आहे. बातमीच्या अनुषांगाने लागलीच वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.अजय वाघमारे, व युनिट-४ चे पथक असे विठ्ठल मंदिराचे पाठीमागे पेरुचे बागेच्यागेट जवळ पाषाण पुणे तेथे बातमीतील वर्णनाचा इसम पेरुच्या बागेच्यागेटजवळ उभा असल्याचे दिसुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याचे नाव पत्ता विचारता त्याने आपले नाव **ओम बाळासाहेब निम्हण वय १९ वर्षे रा.निम्हण विठ्ठल मंदिराजवळ,पाषाण पुणे** असे असल्याचे सांगितले. त्यांचेकडे मिळालेल्या खबरीच्या अनुषंगाने चौकशी केली असता त्याने सांगितले की, मी व दोन साक्षीदाराने धारदार शस्त्राने हल्ला करुन जिवे ठार मारले.सदर बाबत चतु:श्रृंगी पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं.८०/२०२५ भा.न्या.सं.कलम १०३,३(५) व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम३७ (१)(३) सह १३५, प्रमाण गुन्हा दाखल करण्यात आला असुन गुन्हया मध्ये आरोपी ओम बाळासाहेब निम्हण हा पाहिजे आरोपी असल्याने त्यास पुढील कारवाई कामी चतु:श्रृंगी पोलीस ठाणे यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची उल्लेखनिय कामगिरी ही मा.अपर पोलीस आयुक्त गुन्हे,श्री.शैलेश बलकवडे, मा.पोलीस उप आयुक्त सायबर व आर्थिक गुन्हे,पुणे शहर,श्री.विवेक मासाळ, मा.सहायक पोलीस आयुक्त गुन्हे-२, पुणे शहर,श्री.राजेंद्र मुळीक यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक युनिट-४,गुन्हे शाखा पुणे शहर श्री.अजय वाघमारे, पोलीस अमंलदार अजय गायकवाड,हरिष मोरे,विशाल गाडे, विनोद महाजन,एकनाथ जोशी,प्रविण भालचीम,वैभव रणपिसे,रोहिणी पांढरकर,मयुरी नलावडे यांनी केली आहे.


गुन्हे शाखा
पुणे शहर
युनिट क्र.४
इ - ५, रेंजहिल्स, खडकी,
पुणे - २०
फोन नं. २६२०८४६५
Crime Branch
Pune City
UNIT NO. 4
E-5, Rangehills Road, Khadki,
Pune - 20
PH NO. 26208465